जळगाव (प्रतिनिधी) दि. २४ – विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना नवी दिशा व पंख देण्यासाठी कावयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील केसीआयआयएल (KCIIL) इन्क्युबेशन सेंटर तर्फे युवारंग २०२५ अंतर्गत प्रथमच आयोजित होणाऱ्या 'युवा SPARK-२०२५' या विद्यापीठस्तरीय इनोव्हेशन स्पर्धेच्या माहितीपत्रकाचे अनावरण कुलगुरू प्रा. विजय एल. माहेश्वरी यांच्या हस्ते आज २४ सप्टेंबर रोजी करण्यात आले.

या प्रसंगी KCIIL संचालक मंडळ सदस्य डॉ. राजेश जावळेकर, डॉ. आशुतोष पाटील, डॉ. अरुण इंगळे, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील तसेच केसीआयआयएल कार्यक्रम समन्वयक रोशनी जैन उपस्थित होत्या.

युवा SPARK-२०२५ ही स्पर्धा विद्यार्थ्यांना त्यांचे नवोन्मेषी विचार प्रत्यक्षात आणण्याची संधी देणार असून शेती, ग्रामीण विकास, नवतंत्रज्ञान आणि ओपन इनोव्हेशन या क्षेत्रांतून विद्यार्थ्यांना त्यांच्या नवकल्पना सादर करण्यासाठी एक अद्वितीय व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे. ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देऊन त्यांना स्टार्टअप व उद्योजकतेकडे वाटचाल करण्यास प्रेरित करणार आहे.

या स्पर्धेची रूपरेषा : १) कल्पना नोंदणी: २० सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२५, २) ज्युरी द्वारे मूल्यांकन, ३) सर्वोत्कृष्ट १० कल्पनांचे युवारंग २०२५ मध्ये सादरीकरण, ४) ३ सर्वोत्कृष्ट कल्पनांना युवारंग २०२५ मध्ये बक्षीस वितरण. तसेच सर्वोत्कृष्ट १० कल्पनांना KCIIL मार्फत एक वर्ष मोफत इनक्युबेशन सहाय्य दिले जाणार आहे.

विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, आपले कल्पक व नाविन्यपूर्ण विचार मांडावेत आणि विद्यापीठाच्या स्टार्टअप व इनोव्हेशन इकोसिस्टमला अधिक बळकट करावे. ही स्पर्धा केवळ पुरस्कार जिंकण्याची संधी नाही तर आपल्या कल्पनांना वास्तवात आणून स्टार्टअपमध्ये रूपांतरित करण्याची सुवर्णसंधी आहे.

अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी : https://kciil-kbcnmu.in यावर संपर्क साधावा असे आवाहन केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २४ सप्टेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

## जनसंपर्क विभाग

जळगाव प्रतिनिधी दि. १५ – कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेतील परीक्षांमध्ये तृतीय वर्षातील बी.ए. (हिंदी) विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनींना 'कै. डॉ.पितांबर चिमण सरोदे यांच्या नावे सुवर्णपदक' प्रदान करण्यात येणार आहे.

ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत हिंदी राष्ट्रभाषेचे प्रचारक , राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ साहित्यिक कै. डॉ.पितांबर चिमण सरोदे यांच्या नावे सुवर्ण पदकासाठी नितीन चिनावलकर देणगी दिली आहे. हे सुवर्णपदक सुरु झाल्यामुळे मानव्यविद्या (बी.ए.हिंदी) शाखेतील विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव मिळावा व त्यांना प्रेरणामिळून समाजाप्रती एक सुजाण संस्कारशील व्यक्तीमत्व घडावे या उदात हेतूने नितीन वसंत चिनावलकर यांनी ही देणगी दिली आहे. या विषयात अभ्यासाची प्रेरणा निर्माण होणार असून गुणवंत विद्यार्थिनींचा सन्मान करण्याची ही एक आदर्श परंपरा ठरेल, असा विश्वास कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांनी व्यक्त करत विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना मिळावी आणि महिला विद्यार्थिनींना स्पर्धात्मक वातावरणात प्रोत्साहन मिळावे यासाठी या सुवर्णपदकाचा उपयोग होईल. शिक्षण क्षेत्रातील अशी देणगी प्रेरणादायी असून यामुळे इतर दानशूर व्यक्तींनाही शैक्षणिक क्षेत्रात योगदान देण्याची प्रेरणा मिळेल असे म्हटले आहे.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी इंगळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील, नितीन चिनावलकर, सौ.चिनावलकर व उपवित्त व लेखाधिकारी सोमनाथ गोहिल उपस्थित होते.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळे अंतर्गत शिक्षणशास्त्र विभागातर्फे पंधरा दिवसीय आंतरवासिता उपक्रमाचे उद्घाटन नूतन मराठा शिक्षणशास्त्र विद्यालय येथे दि. २३ सप्टेंबर रोजी प्राचार्या डॉ. एस. डी. सोनवणे यांच्या हस्ते संपन्न झाले. नूतन मराठा विद्यालयाच्या आवारात असलेल्या शिक्षणशास्त्र विद्यालय येथे दि. २३ सप्टेंबर २०२५ ते ८ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आंतरवासिता उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्राचार्या डॉ. एस. डी. सोनवणे म्हणाले की, असे उपक्रम शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वात नवा आत्मविश्वास, संघटनशक्ती आणि नेतृत्वगुण जागवतात तसेच यातून त्यांच्यात आत्मशिस्त, जबाबदारीची जाणीव, नेतृत्वगुण, सामूहिक कार्यसंस्कृती आणि समाजाशी एकरूप होण्याची वृत्ती विकसित होणार आहे. आगामी दिवसांमध्ये होणाऱ्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमातून शिक्षक प्रशिक्षणार्थी अधिक सक्षम, संवेदनशील आणि सामाजिक भान असलेले शिक्षक म्हणून घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रस्ताविकात शिक्षणशास्त्र विभागातील डॉ. स्वाती तायडे यांनी आयोजित उपक्रमा संदर्भात माहिती देत हा उपक्रम म्हणजे शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांसाठी एक प्रकारचे संस्कार शिबिरच आहे. येथे विद्यार्थी- अध्यापन प्रात्यक्षिके सादर करतील, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करतील, गटचर्चा, कार्यशाळा व प्रकल्प राबवतील, शिस्त, निवास व आहार व्यवस्था स्वतःच्या जबाबदारीवर सांभाळतील, तसेच सामाजिक जाणिवा वृद्धिंगत करणारे उपक्रम पार पाडतील अशी अपेक्षा व्यक्त केली.

शिक्षणशास्त्र विभागातील डॉ. रणजित पारधे म्हणाले की, एम. एड. द्वितीय वर्ष अभ्यासक्रमातील आंतरवासिता उपक्रम हा केवळ एक औपचारिक कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला दिशा देणारा, विविध कलागुणांना वाव देणारा आणि सहकार्य-संवाद वाढविणारा उपक्रम आहे. शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबरच व्यक्तिमत्त्व घडविण्यात सहशालेय व आंतरवासिता उपक्रमांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास, संघभावना, सामाजिक जाणीव आणि सांस्कृतिक समृद्धी या सर्व गोष्टींचा अनुभव या उपक्रमांमधून मिळतो.

सदर कार्यक्रम हा आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेच्या संचालक तथा शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मनीषा इंदाणी आणि डॉ. संतोष खिराडे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या प्रसंगी मंचावर प्राध्यापक डॉ. एस. बी. पाटील, प्रा. एम. पी. भदाणे, प्रा. एम. बी. मोरे, प्रा. पी. आय. परदेशी, श्री. संदीप वाघ हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गंगा चौधरी तर अमिला गावित यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एम. एड. द्वितीय वर्ष अभ्यासक्रमातील सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २४ सप्टेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता